३ ० DEC 2017 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डहाकेंच्या लेखनातून मानवी मूल्यांचे वर्धन : डॉ. गणोरकर

कोल्हापूर, ता. २९ : 'संतुलित, तटस्थ, कोणाचाही अधिक्षेप न करणारे; तसेच मानवी मूल्यांचे वर्धन करणारे लेखन वसंत आबाजी डहाके यांनी केले. त्यांच्या कवितांमधून काळाच्या पुढील निर्मितीचा ध्वनी झंकारताना जाणवतो,' असे प्रतिपादन ज्येष्ठ मराठी साहित्यिक व समीक्षक डॉ. प्रभा गणोरकर यांनी आज येथे केले.


शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागामार्फत वि. स. खांडेकर भाषाभवन सभागृहात आज 'वसंत आबाजी डहाके यांचे साहित्य' या विषयावर एकदिवसीय चर्चासत्र झाले. त्या वेळी बीजभाषक म्हणून डॉ. गणोरकर बोलत होत्या. अध्यक्षस्थानी डॉ. अशोक चौसाळकर होते. मानव्य विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

डॉ. गणोरकर म्हणाल्या, "कविता म्हणजे वाक्य नव्हे, तर ती मानवी मूल्यांची अभिव्यक्ती असते. त्यांचे शाश्वत मूल्यांत रूपांतर करणे हे कवीचे कार्य आहे. १९५० पासून डहाके यांचे लेखन प्रकाशित होत



विद्यापीठातील चर्चासत्रात बोलताना डॉ. प्रभा गणोरकर.

असले, तरी त्यांना मान्यता मिळवून देणारी कविता म्हणजे 'योगभ्रष्ट'. या कवितासंग्रहामध्ये पुढील काळाच्या निर्मितीची जनुकीय गुणसूत्रे आहेत. भौतिक, सामाजिक, राष्ट्रीय, वास्तव, मानवी दुःख कमी करण्याचे संवेदनशील विचारवंतांनी केलेले प्रयत्न या सर्वांचे प्रतिबिंब व विश्लेषण त्यांच्या साहित्यामध्ये आढळते. छोट्या-छोट्या टिप्पणीतूनही डहाके यांची जीवनदृष्टी व्यक्त होते. एकाच वेळी अनेक गोष्टींचे संदर्भ दृश्यकलेमध्ये त्यांच्या लेखनातून पेरले जातात. त्यांनी मराठीमधील गेल्या सातशे वर्षांत निर्माण झालेल्या कविता केवळ वाचलेल्याच नाहीत, तर त्या



अत्यंत चिकित्सकपणे अभ्यासलेल्या आहेत.

वसंत डहाके म्हणाले, "कवी, कादंबरीकारांना अनुकूल अथवा प्रतिकूल शेरे मिळाले; तरी त्यांना त्यांचे लेखन चालूच ठेवावे लागते. साहित्य, कला यांबद्दल जे जाणवते, ते लिहिले पाहिजे. आपल्या लिखाणातून सामान्य नागरिकाची संवेदनशीलता जपण्याला प्राधान्य दिले पाहिजे."

डॉ. चौसाळकर, डॉ. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. वसंत पाटणकर, डॉ. रणधीर शिंदे उपस्थित होते. मराठी अधिविभागप्रमुख राजन गवस यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
30 DEC 2017 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डहाकेंच्या साहित्यात मानवी मूल्यांचे संवर्धन

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



डॉ. प्रभा गणोरकर यांचे प्रतिपादन

'वसंत आबाजी डहाके यांचे लेखन संतुलित, तटस्थ, कोणाचाही अधिक्षेप न करणारे तसेच मानवी मूल्यांचे संवर्धन करणारे आहे. त्यांच्या कवितांमधून काळाच्या पुढील निर्मितीचा ध्वनी झंकारताना जाणवतो', असे प्रतिपादन ज्येष्ठ मराठी साहित्यिक व समीक्षक डॉ. प्रभा गणोरकर यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागामार्फत वि.स.खांडेकर भाषाभवन सभागृहात 'वसंत आबाजी डहाके यांचे साहित्य' या विषयावर एक दिवसीय चर्चासत्र झाले. त्यावेळी बीजभाषक म्हणून डॉ. गणोरकर बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.अशोक चौसाळकर होते. मानव्य विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ.भारती पाटील यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन झाले.

कविता म्हणजे वाक्य नव्हे, तर ती मानवी मूल्यांची अभिव्यक्ती असते. त्यांचे शाश्वत मूल्यांत रुपांतर करणे हे कवीचे कार्य आहे, असे मानणारे साहित्यिक वसंत आबाजी डहाके असल्याचे सांगून गणोरकर म्हणाल्या, '१९५० सालापासून डहाके यांचे लेखन प्रकाशित होत असले तरी त्यांना मान्यता मिळवून देणारी कविता म्हणजे 'योगभ्रष्ट'. या कविता संग्रहामध्ये पुढील काळाच्या निर्मितीची जनुकीय गुणसूत्रे आहेत. भौतिक, सामाजिक, राष्ट्रीय, वास्तव, मानवी दु:ख कमी करण्याचे संवेदनशील विचारवंतांनी केलेले प्रयत्न या सर्वांचे प्रतिबिंब व विश्लेषण त्यांच्या साहित्यामध्ये आढळते.

साहित्य संस्कृती

छोटया-छोटया टिपणीतूनही डहाके यांची जीवनदृष्टी व्यक्त होते. एकाचवेळी अनेक गोष्टींचे संदर्भ दृष्यकलेमध्ये त्यांच्या लेखनातून पेरले जातात. त्यांनी मराठीमधील गेल्या सातशे वर्षात निर्माण झालेल्या कविता केवळ वाचलेल्याच नाहीत तर त्या अत्यंत चिकित्सकपणे अभ्यासलेल्या आहेत.'

यावेळी वसंत आबाजी डहाके यांनीही मनोगत व्यक्त केले.

डहाके म्हणाले, 'कवी, कादंबरीकारांना अनुकूल अथवा प्रतिकूल शेरे मिळाले तरी त्यांना त्यांचे लेखन चालूच ठेवावे लागते. साहित्य, कला याबद्दल जे जाणवते ते लिहीले पाहिजे. आपल्या लिखाणातून सामान्य नागरिकाची संवेदनशीलता जपण्याला प्राधान्य दिले पाहिजे.'

डॉ.भारती पाटील म्हणाल्या, 'गेली पन्नास वर्षे डहाके यांनी कविता, कादंबरी आदी साहित्याची निर्मिती करुन मराठी साहित्याविश्वास मोठे योगदान दिलेले आहे. त्यांचे साहित्य हे अस्तित्ववादी दृष्टीकोनातून आणि मार्क्सवादी दृष्टीकोनातून लिहिले गेलेले, माणसाच्या दु:खाला वाचा फोडणारे आणि माणसाचे एकाकीपण अधोरेखित करणारे आहे. डहाके यांच्या साहित्यातून जीवनदृष्टी व्यक्त झालेली दिसते. अस्तित्ववादी लिखाणामुळे ते मनाला थेट भिडते. त्यांच्या कवितांमधून संवेदनशील मनाचे दर्शन घडते.'

अध्यक्षस्थानावरुन बोलताना डॉ.अशोक चौसाळकर म्हणाले, 'डहाके यांनी आपल्या लिखाणातून समाजाचे वास्तव चित्र रेखाटले आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये शंकरराव देव यांनी जी भूमिका बजावली, त्यामध्ये त्यांना अनेक संघर्षांना सामोरे जावे लागले. त्यामुळे देव महाराष्ट्राच्या चळवळीतून आणि राजकारणातून कसे दूर फेकले गेले याचे सूक्ष्म लेखन डहाके यांनी केले आहे.'

मराठी अधिविभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. वसंत पाटणकर, डॉ. रणधीर शिंदे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

30 DEC 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प्रभा गणोरकर : शिवाजी विद्यापीठातील चर्चासत्र; 'वसंत आबाजी डहाके यांचे साहित्य'वर मार्गदर्शन


# डहाके यांचे लेखन संतुलित, तटस्थ

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : साहित्यिक वसंत आबाजी डहाके यांचे लेखन संतुलित, तटस्थ, कोणाचाही अधिक्षेप न करणारे आणि मानवी मूल्यांचे वर्धन करणारे आहे. त्यांच्या कवितांमधून काळाच्या पुढील निर्मितीचा ध्वनी झंकारताना जाणवतो, असे प्रतिपादन ज्येष्ठ मराठी साहित्यिक डॉ. प्रभा गणोरकर यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागामार्फत वि. स. खांडेकर भाषाभवन सभागृहात आयोजित केलेल्या चर्चासत्रात बीजभाषक म्हणून त्या बोलत होत्या. 'वसंत आबाजी डहाके यांचे साहित्य' असा या चर्चासत्राचा विषय होता. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर, तर





शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी आयोजित चर्चासत्रात ज्येष्ठ मराठी साहित्यिक व समीक्षक डॉ. प्रभा गणोरकर यांचे बीजभाषण झाले. दुसऱ्या छायाचित्रात ज्येष्ठ साहित्यिक वसंत आबाजी डहाके यांनी मार्गदर्शन केले.

ज्येष्ठ साहित्यिक वसंत आबाजी डहाके प्रमुख उपस्थित होते. मानव्य विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन झाले.

ज्येष्ठ मराठी साहित्यिका गणोरकर म्हणाल्या, कविता म्हणजे वाक्य नव्हे, तर ती मानवी मूल्यांची अभिव्यक्ती असते. त्यांचे शाश्वत मूल्यांत रूपांतर करणे हे कवीचे कार्य आहे, असे मानणारे साहित्यिक वसंत आबाजी डहाके आहेत. सन १९५० पासून डहाके यांचे लेखन प्रकाशित होत असले, तरी त्यांना मान्यता मिळवून देणारी कविता म्हणजे 'योगभ्रष्ट.' या कवितासंग्रहामध्ये पुढील काळाच्या निर्मितीची जनुकीय गुणसूत्रे आहेत. भौतिक, सामाजिक, राष्ट्रीय, वास्तव, मानवी दुःख कमी करण्याचे संवेदनशील विचारवंतांनी केलेले प्रयत्न या सर्वांचे प्रतिबिंब व विश्लेषण त्यांच्या साहित्यामध्ये आढळते. छोट्या-छोट्या टिपणीतूनही डहाके यांची जीवनदृष्टी व्यक्त होते.

डॉ. भारती पाटील म्हणाल्या, गेली पन्नास वर्षे डहाके यांनी कविता, कादंबरी, आदी साहित्याची निर्मिती करून मराठी साहित्यविश्वात मोठे योगदान दिले आहे. त्यांचे साहित्य हे अस्तित्ववादी आणि मार्क्सवादी दृष्टिकोनातून लिहिले गेलेले, माणसाच्या दुःखाला वाचा फोडणारे आणि माणसाचे एकाकीपण अधोरेखित करणारे आहे.

डॉ. चौसाळकर म्हणाले, डहाके यांनी आपल्या लिखाणातून समाजाचे वास्तवचित्र रेखाटले आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये शंकरराव देव यांनी जी भूमिका बजावली, त्यामध्ये त्यांना अनेक संघर्षांना सामोरे जावे लागले. त्यामुळे देव महाराष्ट्र चळवळ, राजकारणातून कसे दूर फेकले गेले याचे सूक्ष्म लेखन डहाके यांनी केले आहे.

या कार्यक्रमास डॉ. वसंत पाटणकर, रणधीर शिंदे, आदी उपस्थित होते. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.

### संवेदनशीलता जपण्याला प्राधान्य

कवी, कादंबरीकारांना अनुकूल अथवा प्रतिकूल शेरे मिळाले, तरी त्यांना त्यांचे लेखन चालूच ठेवावे लागते. साहित्य, कला यांबद्दल जे जाणवते ते लिहिले पाहिजे. आपल्या लिखाणातून सामान्य नागरिकाची संवेदनशीलता जपण्याला प्राधान्य दिले पाहिजे, असे आवाहन ज्येष्ठ साहित्यिक डहाके यांनी केले.

30 DEC 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पर्यावरणपूरक फ्रीज, होममेड वॉटर प्युरिफायर

## शिवाजी विद्यापीठ : आविष्कार संशोधन महोत्सव; दोनशे पदव्युत्तर संशोधकांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : पाणी, भाजीपाला आणि फळे थंड ठेवणारा पर्यावरणपूरक फ्रीज, खडी-माती, कॉटन कापडापासून साकारलेला 'होममेड वॉटर प्युरिफायर', 'पुलावरील दुर्घटना टाळण्यासाठी सावध करणारी अलार्म यंत्रणा', आदी स्वरुपातील संशोधन हे शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी आविष्कार संशोधन महोत्सवात दिसून आले. विद्यापीठातील लोककला केंद्रातील हा महोत्सव पाहण्यास विद्यार्थी-विद्यार्थिनींची गर्दी झाली होती.

या महोत्सवाचे उद्घाटन सकाळी अकरा वाजता कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते झाले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, कोल्हापूर विभागीय उच्चशिक्षण सहसंचालक डॉ. अजय साळी, महोत्सवाचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे समन्वयक प्रा. डॉ. पी. एस. पाटील, आदी उपस्थित होते. उद्घाटनानंतर कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांच्यासह प्रमुख उपस्थितांनी महोत्सवातील प्रकल्पांची पाहणी करुन विद्यार्थी-विद्यार्थिनींसमवेत संवाद साधला. या महोत्सवात विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागातील कोमल भोपळे या विद्यार्थिनीने सोयाबीन आणि खजुरापासून बनविलेल्या चॉकलेटची, तर धनश्री शिंदे यांनी कॅन्सर रुग्णासाठीच्या सूपची माहिती सादर केली. सायबर महाविद्यालयातील शिक्षिका श्रद्धा कुलकर्णी यांनी बाजरी, बेसन आणि गव्हाच्या पीठातून साकारलेला प्रोटिनयुक्त 'खाकरा' याची माहिती सादर केली. तासगांवमधील पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील महाविद्यालयातील एम. ए. भूगोलच्या विद्यार्थ्यांनी पुलावरील दुर्घटना टाळण्यासाठी सावध करणारी अलार्म यंत्रणेचा प्रकल्प मांडला. या महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी इको फ्रेंडली फ्रीजचा प्रकल्प सादर केला. लोहमिश्रित मातीपासून बनविलेल्या या फ्रीजसाठी पाचशे रुपये खर्च आला. विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागातील विनायक साळोखे याने खडी-माती, कॉटन कापड आदींच्या माध्यमातून बनविलेला होममेड वॉटर प्युरिफायर सादर केला. त्यात त्याने ग्रामीण भागात पाणी शुद्धिकरणासाठी कमी खर्चातील तंत्रज्ञान मांडले. तसेच अन्य महत्वपूर्ण प्रकल्प मांडले होते.



आदित्य वेल्हाळ

शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी आविष्कार संशोधन महोत्सवातील प्रकल्प, भित्तीपत्रके पाहण्यासाठी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी गर्दी केली होती.

### बारकाईने माहिती

'आविष्कार'मध्ये मानव्यशास्त्र, वाणिज्य, मूलभूत विज्ञान, शेती व पशुसंवर्धन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, वैद्यकशास्त्र व औषधशास्त्र प्रकारातील या महोत्सवात २१५ पदव्युत्तर संशोधक, शिक्षक, विद्यार्थी स्पर्धक सहभागी झाले होते. संशोधन प्रकल्प पाहण्यासाठी दिवसभर विद्यार्थ्यांची गर्दी होती. आपल्या विषयाशी निगडित प्रकल्पांची ते अगदी बारकाईने माहिती टिपून घेत होते.

### मध्यवर्ती महोत्सव शुक्रवारी

कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हानिहाय आणि विद्यापीठात झालेल्या महोत्सवातील प्रत्येक गटातील तीन विजेत्यांची निवड मध्यवर्ती महोत्सवासाठी होईल. हा महोत्सव शुक्रवारी (दि. ५ जानेवारी) विद्यापीठात होणार आहे. त्यातील प्रत्येक गटातील एका विजेत्याला राज्यस्तरीय आविष्कार महोत्सव सहभागी होता येणार आहे. राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठात दि. १५ ते १७ जानेवारीदरम्यान राज्यस्तरीय महोत्सव होईल, अशी माहिती डॉ. गुरव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 DEC 2017
Times of India

# University kick-starts Avishkar research festival

Times News Network

Rahul Gaikwad



The event provides a platform to showcase one's talent

**Kolhapur:** The university-level Avishkar research festival was inaugurated at the Shivaji University, Kolhapur (SUK) on Friday.

University registrar Vilas Nandavadekar was present at the inauguration ceremony at the Lok Kala Kendra at the SUK campus. According to an SUK official, the festival will witness participation of around 200 research scholars, along with PhD, MPhil students, and faculties from different colleges.

Nandavadekar said the university is focusing more on the research sector and festivals like Avishkar are necessary to boost the researcher's potential. The event provides a much needed platform to showcase one's talent, the registrar said.

The university official added that the festival is categorized into six streams that include humanities, commerce, pure sciences, agriculture and animal husbandry, engineering and technology and medicine and pharmacy. The festival has also been categorised for undergraduate (UG) and post-graduate (PG) students, research scholars and faculty members.

**The university official added that the festival is categorized into six streams that include humanities, commerce, pure sciences, agriculture and animal husbandry, engineering and technology and medicine and pharmacy**

An SUK official added that the festival aims to promote active participation of students in research. The festival is an initiative from the chancellor's office to boost the culture of research among students and faculty members.

Events at the district-level have already been conducted across the division. Winners from the district level will advance to the central research festival on January 5 at the SUK's nano-science and technology department.

The university official said boosting research culture among students and faculty members remains a top priority.

The Shivaji University, Kolhapur has 283 affiliated colleges across Sangli, Satara and Kolhapur districts. Over 2.5 lakh students are enrolled in different streams and courses. Of the 283 colleges, around 190 host conventional courses like arts, commerce and science.

जनसंपर्क कक्ष
30 DEC 2017 लोकसत्ता शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महासत्ता होण्यामध्ये विषमतेचा प्रमुख अडसर - डॉ. भालचंद्र मुणगेकर

प्रतिनिधी, कोल्हापूर

**सत्ता, संपत्ती** आणि त्यायोगे येणारी प्रतिष्ठा हे विषमता निर्मितीचे प्रमुख स्रोत आहेत. ही विषमता देशाच्या महासत्ता होण्याच्या मार्गातील प्रमुख अडसर आहे. तो दूर करण्यासाठी तसेच उपेक्षित घटकांना विकासाची समान संधी प्रदान करण्यासाठी राज्य व केंद्र सरकारने प्रयत्नांची पराकाष्टा करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत व अर्थशास्त्रज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागातर्फे असमानतेची आव्हाने-स्थानिक ते वैश्विक या विषयावर डॉ. मुणगेकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख म्हणून उपस्थित होते.

डॉ. मुणगेकर यांनी आपल्या भाषणात विषमतेच्या कारणांची आणि त्यावरील उपायांची अत्यंत मुद्देसूद मीमांसा केली. ते म्हणाले, समता व स्वातंत्र्य आणि समता की स्वातंत्र्य हा वाद अगदी अरिस्टॉटल आणि प्लेटोच्या काळापासून सुरू आहे. तथापि, समतारहित समाजात स्वातंत्र्य असू शकत नाही, इतकी त्यांच्यात परस्परपूरकता आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्त्वांना सर्वोच्च स्थान प्रदान केले.

## तोंडी तलाकला विरोध, पण ...

देशातील मुसलमानांची स्थितीही दलितांपेक्षा वेगळी नाही, मात्र लोक त्यांच्याकडे संशयाने पाहतात आणि त्या संशयाचे जागतिकीकरण करतात..दारिद्र्य, भेद आणि विषमता या तिन्ही पातळ्यांवर त्यांचे शोषण केले जाते, ही गंभीर बाब असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. तोंडी तलाकला आपला विरोध आहेच, पण तो सिद्ध होण्यापूर्वी अजामीनपात्र तीन वर्षांची शिक्षा देण्याला मात्र विरोध आहे, या भूमिकेचाही त्यांनी या वेळी पुनरुच्चार केला.

30 DEC 2017
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वंचितापर्यंत उच्च शिक्षणातील संधी पोहोचणे आवश्यक : डॉ. दिलीप पाटील

## विद्यापीठात एकदिवसीय राष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

समाजातील वंचित घटकापर्यंत उच्च शिक्षणातील विविध संधी पोहोचविणे आवश्यक आहे. अध्ययन आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे हेच ध्येय असले पाहिजे, असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाचे अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. दिलीप पाटील यांनी केले. ते शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाने आयोजित केलेल्या '२१ व्या शतकातील आजीवन कौशल्ये' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी अमेरिकेच्या पेनीसिल्वनिया विद्यापीठाचे प्रा. मिलिंद रानडे होते.

डॉ. दिलीप पाटील म्हणाले, २१ वे शतक हे ज्ञानाचे शतक आहे. स्वःअनुभवावर आधारित अनेक जीवन कौशल्ये येणाऱ्या काळात विद्यार्थ्यांना मुख्यतः समाजातील वंचित घटकांना, दुर्लक्षित वर्गाला तसेच मुख्य प्रवाहापासून दूर गेलेल्या घटकापर्यंत म्हणजेच शेतकरी, गृहिणी, कारागीरवर्ग इत्यादींना जीवन कौशल्ये देण्याचे काम हे आपले ध्येय समजून आजीवन अध्ययन विभागाने करावे.

प्रा. मिलिंद रानडे यांनी अमेरिकेत निरंतर शिक्षणात चाललेले नवीन प्रयोग व स्वअनुभव सांगितले. भाषा आणि संस्कृती एकाच नाण्याच्या दोन बाजू असून समाजाला उपयोगी पडणारे शैक्षणिक प्रयोग विविध क्षेत्रात करता येऊ शकतात. या बाबतीत अमेरिकेतील सद्यःपरिस्थिती सांगितली. दिवसभर चाललेल्या या परिषदेत देशभरातून आलेले शोधनिबंध सादर करण्यात आले.

परिषदेचा समारोप डॉ. भालबा विभूते यांच्या मार्गदर्शनाने झाला. त्यावेळी त्यांनी निरंतर शिक्षण प्रक्रिया, विविध शैक्षणिक आयोग, विद्यापीठ अनुदान आयोगाची भूमिका या विषयावर चर्चा केली. अध्यक्षीय समारोप मानव्यविद्या शाखा अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांच्या भाषणाने झाला. या परिषदेच्या आयोजनासाठी विभागाच्या संचालिका व विभागप्रमुख डॉ. सुमन बुवा यांनी परिषद समन्वयक म्हणून काम पाहिले. त्यांना प्रा. यशोधन बोकिल, शिक्षणशास्त्र अधिविभागातील डॉ. व्ही. एस. खंडागळे, दूरशिक्षण विभागातील डॉ. रूपाली संकपाळ, डॉ. के. बी. पाटील यांनी सहकार्य केले.

30 DEC 2017 लोकमत
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ संघाला विजेतेपद

## आंतरविद्यापीठ हॉकी :अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : गुजरात तंत्र विद्यापीठ येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ हॉकी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाने बरकतुल्ला विद्यापीठ (भोपाळ)चा पराभव करत विजेतेपद पटकाविले. या विजयामुळे शिवाजी विद्यापीठ संघ अखिल भारतीय विद्यापीठ हॉकी स्पर्धेसाठी पात्र ठरला.

शिवाजी विद्यापीठ संघाने पहिल्या सामन्यांत 'राजस्थान'च्या जनार्दन रेन विद्यापीठाचा २-० असा पराभव केला तर दुसऱ्या सामन्यात यजमान गुजरात तंत्र विद्यापीठाचा तब्बल ७-० असा पराभव केला. तिसऱ्या सामन्यांत सौराष्ट्र विद्यापीठावर ७-१ अशी मात केली. अंतिम सामन्यात बरकतुल्ला विद्यापीठ संघावर ३-० ने मात केली.



गुजरात तंत्र विद्यापीठ येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ हॉकी स्पर्धेत विजेतेपद पटकाविलेला संघ

विजयी संघात शुभम सुतार (कर्णधार), सचिन भोसले, सौरभ सावंत, अवधूत पाटील, सूरज काळे, विनय नेरकर, निहाल मणेर, पद्मराज शिंदे, रोहन पवार, गणेश पाटील, संकेत तोरळेकर, रोहित रेडेकर, ओंकार पाटील, प्रशिक्षक रणजित इंगवले, व्यवस्थापक विकास जाधव यांचा समावेश होता. या संघास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

30 DEC 2017 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : महोत्सवात श्रद्धा बेळगुप्पे हिने तयार केलेला अळीचा प्रादुर्भाव रोखण्याचे तंत्र या उपक्रमाची माहिती घेताना विद्यार्थिनी.



कोल्हापूर : इको फ्रेंडली फ्रीजचा वापर या विषयीची माहिती विद्यार्थ्यांना देताना डॉ. वसंतदादा पाटील कॉलेजच्या संशोधक विद्यार्थिनी.



कोल्हापूर : विद्यापीठातील संशोधक विद्यार्थिनी कोमल भोपळे हिच्याकडून प्रोटीन चॉकलेटविषयी माहिती घेताना विद्यार्थिनी.

# तरुणाईचे संशोधन पाहण्यास झाली गर्दी

## शिवाजी विद्यापीठात आविष्कार संशोधन महोत्सवास प्रतिसाद; विविध प्रकल्पांचे सादरीकरण

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २९ : शिक्षणाचा बदलता ट्रेंड, स्टार्टअप इंडिया, कार्पोरेट क्षेत्रातील बॅंका, सेंद्रिय शेती, विजेची बचत, पाणी शुद्धीकरण, पिकांवरील किडीचा प्रादुर्भाव रोखण्याची पद्धती यासह वेगवेगळे वैज्ञानिक प्रकल्पांचे सादरीकरण शिक्षकांसह विद्यार्थ्यांनी केले. निमित्त होते शिवाजी विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर पातळीवरील आविष्कार संशोधन महोत्सवाचे. तरुण संशोधकांनी सादर केलेले संशोधन पाहण्यासाठी लोककला केंद्रात विद्यार्थी, शिक्षक, पालकांसह विज्ञानप्रेमींनी मोठी गर्दी केली होती.



आविष्कार संशोधन महोत्सवाचे उद्घाटन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त लेखाधिकारी अजित चौगले, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, ए. एम. गुरव, टी. एस. पाटील यांच्या हस्ते झाले. यात पदवी, पदव्युत्तर संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक या गटातील २१५ स्पर्धक सहभागी झाले. याचे संयोजन विद्यापीठातील नॅनो सायन्स ॲंड टेक्नॉलॉजी विभागाने केले.

ही स्पर्धा मानवशास्त्र, भाषा, ललितकला, शिक्षणशास्त्र, वाणिज्य व्यवस्थापन आदी गटांमध्ये घेण्यात आली. स्पर्धेतील पहिल्या तीन विजेत्यांची मध्यवर्ती महोत्सवासाठी निवड होणार आहे. तो महोत्सव ५ जानेवारीला शिवाजी विद्यापीठात होणार आहे.

विद्यार्थ्यांनी अभ्यास, परीक्षण, संदर्भ आणि कल्पकतेतून महोत्सवात प्रकल्प सादर केले. यात शिक्षणावरील खर्चाचा ट्रेंड कसा बदलत चालला आहे. स्टार्टअप इंडियावरील मार्गदर्शन, तृतीयपंथीचे जीवन, कॉर्पोरेट क्षेत्रातील इंडियन बॅंकांची भूमिका, खासगी रुग्णालये, उद्योग संस्थेतील कामगारांची स्थिती, चांदी कारागिरांचे जीवन याची मांडणी वाणिज्य विभागातील स्पर्धकांनी आकडेवारीनिहाय केली.

'कारखान्यातील वेस्टेज् सोयाबीनपासून कोमल भोपळे या विद्यार्थिनीने केलेले प्रोटीनयुक्त चॉकलेट, सायबर कॉलेजची विद्यार्थिनी श्रद्धा कुलकर्णीने तयार केलेला शरीराला ऊर्जा देणारा 'खाकरा', तासगावच्या पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेला 'फ्रिज सेफ्टी अलर्ट' प्रोजेक्ट सिस्टीम, एखाद्या पुलाला धोका निर्माण झाल्यास इशारा देणारी यंत्रणा, लोहमिश्रित मातीपासून तयार केलेला हंडा अर्थात इको फ्रेंडली फ्रीजने महोत्सवात वेगळी जागा निर्माण केली. या मातीच्या हंड्यात पाण्याबरोबर पाच भाज्या ठेवता येतात.

### हे आहे पाहण्यासारखे....

पर्यावरणशास्त्र विभागातील विनायक साळुंखेने तयार केलेला घरगुती वापराच्या वस्तूंपासून तयार केलेला पाणी शुद्धीकरणाचा प्रकल्प, खडी, पाणी, वाळू, कोळशाची भुकटी, कॉटन कापडाच्या वापरापासून तयार केलेला वॉटर प्युरिफायरपासून पाणी शुद्धीकरण कसे होऊ शकते, याचे त्याने सादरीकरण केले. विजेची बचत करण्यासाठी तयार केलेले सेन्सर सिस्टीम, पिकांवरील अळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी श्रद्धा बेळगुप्पे या विद्यार्थिनीने तयार केलेली उपाययोजना, धनश्री शिंदे यांनी कर्करोगाने त्रस्त असणाऱ्यांसाठी तयार केलेले 'सूप' यासह विविध वैज्ञानिक संशोधन प्रकल्प पाहण्यासाठी विज्ञानप्रेमींनी गर्दी केली होती.